महाराष्ट्रातील सैनिकी शाळेतील मागासवर्गीय
विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याची योजना
निर्वाह भत्ता व उत्पन्न मर्यादेत वाढ करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक:- इबीसी-२००३/प्र.क्र.१८४/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक : १७ सप्टेंबर, २००३

वाचा :- १) शासन निर्णय, समाज कल्याण व क्रीडा विभाग क्रमांक :इबीसी-१०७७/ २६२५४/- डेस्क-५, दिनांक १/८/१९७८
२) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक : इबीसी-१०९१/२२८०/प्र.क्र.१३/मावक-२, दि.३०/४/९४
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : इशैश-१०९५/(२०३८/९५)/माशि-७, दिनांक २९/९/९८
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : इशैश-२००१/(२८५/०१)/माशि-७, दिनांक ५/७/२००२

**प्रस्तावना :-** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना शासकीय सैनिक स्कूल, सातारा, श्री. शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल, पुणे व भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक या सैनिकी शाळेत शिक्षण घेण्याकरीता निर्वाह भत्ता मंजूर करण्याची योजना सन १९७६-७७ पासून राबविण्यात येत आहे. तसेच वरील संदर्भ क्र.३ मधील शासन निर्णयान्वये शालेय शिक्षण विभागाने परवानगी दिलेल्या खाजगी स्वयंसेवी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येणाऱ्या सैनिकी शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मंजूर करण्यात येतो. ज्या पालकांचे उत्पन्न रु.२४,०००/- दरमहा च्या कमाल मर्यादेत आहे, अशा पालकांच्या मुलांना सदर योजनेचा लाभ देण्यात येतो. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या निर्वाह भत्यात वाढ करणे तसेच पालकांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना सैनिक स्कूल, सातारा, श्री. शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल, पुणे व भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक या सैनिकी शाळेत शिक्षण घेण्याकरीता या शाळांमधून प्रचलित दराने आकारण्यात येणाऱ्या संपूर्ण खर्चाची रक्कम तसेच शालेय शिक्षण विभागाने परवानगी दिलेल्या खाजगी स्वयंसेवी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येणाऱ्या सैनिकी शाळांमधून शिक्षण घेणाऱ्याकरीता शालेय शिक्षण विभागाने संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये निर्धारित केलेल्या वार्षिक शुल्काची रक्कम रु.२५,०००/- संबंधित संस्थेस अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. भारत सरकार शासनाच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीधारकांना केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.६५,२९०/- पर्यंत कमाल मर्यादित आहे, अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यास शासन मंजूरी देत आहे.

३. वरील परिच्छेद १ अन्वये योजनेचा लाभ घेणारे मागासवर्गीय विद्यार्थी या व्यतिरिक्त इतर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्क मंजूर करणे या योजनांच्या सोबत केंद्र व राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शैक्षणिक योजनांचा लाभ घेण्यास पात्र ठरणार नाहीत.

४. यावर होणारा खर्च "मागणी क्रमांक एन-४, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१, अनुसूचित जातींचे कल्याण, २७७, शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (विषयी) राज्य योजनांतर्गत योजना (०४) (१२) सैनिकी शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परिरक्षण भत्ता (२२२५ ०४५ १)" या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून त्याखाली केलेल्या चालू आर्थिक वर्षाच्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५३३/०३/व्यय-१४, दिनांक २३/६/२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(न. मा. शिलवंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
प्रधान सचिव, वित्त विभाग.
सचिव, शालेय शिक्षण विभाग.
सर्व मंत्रालयीन विभाग.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परीक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
सर्व कोषागार अधिकारी

[illegible]

## योजना क्रमांक १ (२५) सैनिक शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता.

**अंमलबजावणी कार्यालय** जिल्हा समाज कल्याण अधिकारी.

**उद्दिष्ट व स्वरूप :** मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळावा यासाठी सैनिक शाळांतून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे म्हणून विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता दिला जातो.

सदरहू योजना शासन निर्णय क्र. इबीसी-१०७४/५६४२३/डी-५, दि. ६.८.७५ अन्वये सन १९७६-७७ पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

**योजनेच्या अटी व शर्ती :**

१. मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १८०००/- पेक्षा जास्त नसावे.

२. विद्यार्थी ५वी ते १०वी पर्यंतच्या वर्गात शिकणारा असावा.

३. मागासवर्गीय विद्यार्थी अनुसूचित जाती/जमाती/विजाभज/विमाप्र. संवर्गातील असावा.

**लाभाचे स्वरूप :**

१. सैनिक शाळेतील वसतिगृहातील निवास, भोजन, कपडे इत्यादीवरील १००% खर्च देण्यात येतो.

२. पॉकेटमनी, घोडेस्वारी, शिक्षण फी, परीक्षा फी इत्यादीवरील संपूर्ण खर्च.

**संपर्क :(कोणाकडे अर्ज करावा)** १. संबंधित सैनिक शाळांचे प्राचार्य/मुख्याध्यापक.